# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**१६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २५.०४.२०२५**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (१८/०४/२०२५ ते २४/०४/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२६/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | दिनांक | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ३ | ० | ० | ० |
| ३८.६ | ३८.४ | ३९.४ | ३८.८ | ४१.० | ४१.२ | ४०.४ | कमाल तापमान (अंसे) | ४२ | ४० | ३९ | ४० | ४१ |
| १९.५ | १९.३ | १९.९ | १९.५ | २०.९ | २१.१ | २१.७ | किमान तापमान (अंसे) | २६ | २५ | २५ | २५ | २६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ३ | ४ | २ | ० | १ |
| ५८ | ६१ | ५६ | ५२ | ५१ | ४८ | ५० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४५ | ४६ | ४५ | ४५ | ४६ |
| २८ | २५ | २३ | २१ | २४ | ३२ | २४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १५ | १६ | १५ | १६ | १६ |
| १.२ | १.३ | १.३ | १.२ | १.२ | १.३ | १.२ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १० | ९ | ६ | ९ | १३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील दोन दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तदनंतर आकाश कोरडे असण्याची शक्यता आहे. तसेच दि. २७ एप्रिल रोजी काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | पावसाची शक्यता असल्याने कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी/ शेडमध्ये ठेवावीत किंवा प्लास्टिक पेपरने झाकून ठेवावीत. |
| संदेश | | दि. २७ एप्रिल रोजी काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| कांदा | काढणी | कांदा काढणीनंतर शेतात वाळविताना ढीग न करता पहिला कांदा दूस-या कांद्याच्या पातीने झाकून जाईल असा एकसारखा पसरून ५ दिवस वाळवावा, त्यानंतर ३-५ सेमी कांद्याची मान ठेवून पात कापावी व २ आठवडे सावलीत वाळवावा. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा पोसण्याची अवस्था | भुईमुग पिकास शेंगा पोसण्याच्या अवस्थेत (६५ ते ७० दिवस) पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थेत संरक्षित पाण्याची पाळी गरजेप्रमाणे द्यावी.<br>भुईमुग पिकात काही ठिकाणी पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पिकावर क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून निरभ्र वातावरणात फवारणी करावी. |
| बाजरी | दाणे भरणे | तापमानात वाढ झाल्याने दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये संरक्षित पाण्याची पाळी द्यावी.<br>पेरणीनंतर ६० आणि ६५ दिवसांनी पिकावर डीएपी (१८:४६:००) किंवा १९:१९:१९ या विद्राव्य खताच्या २ % द्रावणाची २० ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे हवामान कोरडे असताना फवारणी करावी.<br>बाजरी पिकावरील सोसे/हिंगे या किडीच्या नियंत्रणासाठी वारा शांत असताना कणसांवर मिथिल पॅराथिऑन (२%) ८ किलो प्रति एकरी धुरळणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | मे महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ९.२४ प्रति दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज ९.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज २ तास २० मिनिटे चालवावा.<br>सुरू ऊस लागवडीनंतर १६ ते १८ आठवड्यांनी रासायनिक खतांची मात्र देऊन पहारीच्या औजाराने वरंबे फोडून आंतर मशागत करावी व सायन कुळव रिजरने मोठी बांधणी करावी.<br>मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १३६ किलो (युरिया २९५ किलो), स्फुरद ८५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ५३१ किलो) व पालाश ८५ किलो (म्युरेट ऑफ पोटॅश १४२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी. |
| टोमॅटो/ मिरची | वाढ | १) फळ पोखरणाऱ्या/ अळीच्या व्यवस्थापनासाठी लावणीनंतर २० दिवसांनी ६ कामगंध सापळे प्रती एकरी लावावेत.<br>२) लीफकर्ल व्हायरसच्या नियंत्रणासाठी संक्रमित झाडे काढून टाकणे तसेच हा विषाणू प्रसारित करणाऱ्या पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामानात निंबोळी आधारित कीटकनाशके १० मिली (५ ईसी) ते ६० मिली (०.०३ ईसी) प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| भाजीपाला पिके | | नुकत्याच लागवड झालेल्या रोपाना सावली करण्याची व्यवस्था करावी.<br>गरम वाऱ्याला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेला, बांदावर व्यवस्था करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **फळ पिके** | | नविन लागवड केलेल्या फळाबागांच्या कलमी रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे. तसेच ठिबकव्दारे पाणी द्यावे. |
| **पशुसंवर्धन** | | जनावरांना सावलीत ठेवावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे.<br>जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये.<br>हिरवे गवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे.<br>जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे.<br>तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झाकावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| **कुक्कुटपालन** | | पोल्ट्री हाऊसमध्ये पडदे लावावेत आणि हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : २५.०४.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**